# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय**: विद्यापीठ सेवकांसाठी गृहकर्जावरील व्याज योजनेबाबत.

**संदर्भ**:-१)परिपत्रक क्र. २६२/२००३, दि. १७ जुलै, २००३
२)परिपत्रक क्र. १८१/२००८, दि. ०९ एप्रिल, २००८
३)परिपत्रक क्र. ४४१/२००८,दि.२६ नोव्हेंबर, २००८
४)परिपत्रक क्र. ७८/२०११, दि. २२ जून, २०११

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना लागू करण्यात आलेल्या गृहकर्जावरील व्याज योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला असून सदर योजनेची रुपरेषा खालीलप्रमाणेः-

१. गृहकर्ज व्याज योजनेमध्ये २% सवलतीची व्याप्ती वाढविण्याची अंमलबजावणी आर्थिक वर्ष २०१८-१९ पासून लागू होईल.
२. सेवकास एका वेळेस एकाच व विद्यापीठाच्या सेवा कालावधीमध्ये जास्तीत जास्त दोन वेळेस या योजनेचा लाभ घेता येईल. गृहकर्ज व्याज योजनेचा दुस-या वेळेस लाभ घेताना पहिले गृहकर्ज पूर्णपणे वसूल झाल्याचे संबंधित बँकेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
३. विद्यापीठ सेवक गृहकर्जास प्रथम अर्जदार असल्यास २% व्याज सवलत व द्वितीय अर्जदार असल्यास १% व्याज सवलत देण्यात येईल.
४. विहित प्रक्रियेचा अवलंब करुन नियमित वेतन श्रेणीमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.
५. गृहकर्ज व्याज योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमून्यात शिक्षक व शिक्षकेतर विभागामार्फत वित्त व लेखा विभागाकडे अर्ज करण्यात यावा.
६. विद्यापीठाच्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या पती/पत्नी/मुलगा/मुलगी द्वितीय अर्जदार असल्यास अशा सेवकांनी या योजनेचा लाभ घेताना दुस-या आस्थापनेकडून गृहकर्ज व्याज योजनेचा लाभ घेतलेला नाही असे हमीपत्र देणे आवश्यक राहील.
७. आर्थिक वर्ष २०१८-१९ पासून बँक ऑफ महाराष्ट्र विद्यापीठ परीसर व चतु:श्रृंगी या शाखांमधुन गृहकर्ज घेतले असल्यास इतर बँकांप्रमाणे वार्षिक व्याजदर परताव्यासाठी विहित नमून्यात अर्ज करण्यात यावा.
८. विद्यापीठ सेवकावर शिस्तभंगाची कारवाई होऊन त्यांना कोणतीही जबर शिक्षा(major penalty) अथवा कोणतीही किरकोळ शिक्षा(minor penalty) झालेली नसावी. परंतु शिक्षा झालेल्या सेवकांस शिक्षा झाल्याच्या दिनांकापासून पाचवर्षापर्यंत सदर योजनेचा लाभ देय होणार नाही. मात्र असा सेवक न्यायालयाच्या निर्णयाद्वारे दोषमुक्त ठरल्यास अथवा शिस्तभंग विषयक कारवाईमध्ये निर्दोष ठरल्यास अशावेळी त्यांना सदर लाभ देय राहील.

पुढे पहा

९. एखादया कर्मचा-याची विनावेतन रजा झाल्यास या योजनेचा विनावेनतन रजेच्या कालावधीचा लाभ मिळणार नाही. त्याला मिळणारा लाभ खालील सूत्राप्रमाणे निश्चित केला जाणार आहे.

$$\frac{\text{(एकूण लाभ)} \times \text{(३६५ – विनावेतन रजेचे दिवस)}}{\text{३६५}}$$

१०.सदर लाभ देण्याबाबत काही प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना असतील.

११.यापूर्वी गृहकर्ज व्याज योजनेचा लाभ घेण्यासाठी बॅंकेने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे मागील आर्थिक वर्षाची सवलतीची रक्कम सेवकास एप्रिल महिन्यात अदा करण्यात येत होती. आर्थिक वर्ष २०१८-१९ पासूनची अंमलबाजवणी प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने याबाबतची माहिती भरण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात येणार असून हे पोर्टल तयार झाल्यानंतर यामध्ये माहिती कशापध्दतीने भरावयाची आहे याबाबतचे स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येईल. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

Gargote

(सीए (डॉ.) विद्या गारगोटे)
वित्त व लेखा अधिकारी
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/१०००
दिनांक : २२ सप्टेंबर,२०१८